| | | |
|---|---|---|
| MHST140038962023 | दाखल तारीख | २७.१२.२०२३ |
| | नोंदणी तारीख | ०१.०१.२०२४ |
| | निकाल तारीख | २७.०७.२०२६ |
| | कालावधी | वर्षे महिना दिवस<br>०२ ०७ ०० |

**भाग अ**

**फलटण येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.३) यांचे न्यायालयात**

(पिठासिन अधिकारी–ए.एस.साटोटे)

**नियमीत फौजदारी खटला क्र.०१/२०२४**

**निशाणी क्र. ४१**

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन,<br>ता.फलटण , जि.सातारा |
| तर्फे विधीज्ञ | श्रीमती एस.एन.वायकर |
| | विरुध्द |
| आरोपी | १. सचिन विष्णु चांगण (दोषारोपपत्र ठेवलेले नाही) |
| | २. आकाश काशिनाथ डांगे,<br>वय–२७ वर्षे, धंदा– शेती,<br>रा. भाडळी बु., ता. फलटण, जि. सातारा |
| | ३. स्वागत ऊर्फ जयराज आनंदराव चव्हाण,<br>वय–३४ वर्षे, धंदा– शेती,<br>रा. झिरपवाडी, ता.फलटण, जि.सातारा |
| | ४. अर्जुन ऊर्फ सुनिल दादासो पिसाळ,<br>वय–३५ वर्षे, धंदा– शेती,<br>रा. भाडळी, ता. फलटण, जि. सातारा |

| | |
|---|---|
| आरोपींतर्फे विधीज्ञ | श्री. एस.एम.सस्ते |

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २५.०३.२०२१ |
| पहिली खबर | २५.०३.२०२१ |
| दोषारोपपत्र दिनांक | २९.०७.२०२३ |
| दोषारोप निश्चीत दिनांक | २२.०९.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १६.१२.२०२५ |
| न्यायनिर्णयाकरीता निश्चीत केल्याचा दिनांक | २७.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | २७.०७.२०२६ |
| शिक्षेचा दिनांक असल्यास | ....... |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षेचा तपशिल | कलम ४२८ फौ.प्र.संहितेच्या अनुषंगाने सम परिक्षेदरम्यान कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | आकाश काशिनाथ डांगे | २७.०३.२१ | २७.०३.२१ | भा.दं.वि.क. ४५२,३२३, ५०४,५०६, ४२७ सह कलम ३४ | निर्दोष | .... | .... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | स्वागत ऊर्फ जयराज आनंदराव चव्हाण | २७.०३.२१ | २७.०३.२१ | भा.दं.वि.क. ४५२,३२३, ५०४,५०६, ४२७ सह कलम ३४ | निर्दोष | .... | .... |
| ४ | अर्जुन ऊर्फ सुनिल दादासो पिसाळ | २७.०३.२१ | २७.०३.२१ | भा.दं.वि.क. ४५२,३२३, ५०४,५०६, ४२७ सह कलम ३४ | निर्दोष | .... | .... |

## <u>भाग क</u>

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| १ | वनिता विजयकुमार डांगे | फिर्यादी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार असल्यास–**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयातर्फे साक्षीदार असल्यास–**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | ३१ | फिर्यादवरील सही |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन पुरावा**

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**न्या य नि र्ण य**

(घोषीत दिनांकः २७.०७.२०२६)

आरोपींविरुध्द सदरचा खटला भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम ३४ अन्वये चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

२. फिर्यादी वनिता विजयकुमार डांगे यांनी दि.२५.०३.२०२१ रोजी फलटण ग्रामीण पोलिस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली की, दि.२४.०३.२०२१ रोजी रात्री ११.३० वा. चे सुमारास मौजे भाडळी बु., ता.फलटण, जि.सातारा गावचे हद्दीत आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी हे त्यांचे घरात झोपले असताना फिर्यादीचे घरासमोर येवून मोठमोठयाने शिव्या देवून घराचे दरवाजावर लाथा मारुन

घराचा कडीकोयडा तोडून दरवाजाचे नुकसान करुन घरामध्ये येवून फिर्यादी व तिचे मुलास 'तु व तुझे वडिल आमच्या पेपरला बातम्या देताय' असे म्हणून मारहाण करुन शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. म्हणून आरोपींविरुध्द फिर्यादीने घडलेल्या घटनेची तक्रार पोलीस स्टेशन फलटण ग्रामीण येथे दिली.

३. वर नमूद फिर्यादवरुन फलटण ग्रामीण पोलीसांनी आरोपींविरुध्द गुन्हा रजि. नं.१०९/२०२१ भा.दं.वि.कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम ३४ अन्वये दाखल केला. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर आरोपी क्र. २ ते ४ यांच्याविरुध्द वर नमूद कलमांतर्गत दोषारोप नि.क्र.१७ अन्वये निश्चीत करण्यात आला आहे. आरोपी क्र.१ विरुद्ध दोषारोपपत्र दाखल न केल्यामुळे त्याच्यावर दोषारोप ठेवण्यात आलेला नाही. आरोपी क्र. २ ते ४ यांनी दोषारोप नाकबुल केला व संपरिक्षेची मागणी केली. सरकार पक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपींविरुध्द पुरावा न आलेने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपींचे निवेदन नोंदविले नाही. तसा आदेश नि.क्र.१ खाली पारीत केला आहे.

४. एकंदर संचिकेतील कागदपत्रे व पुरावा बघता, खालीलप्रमाणे मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी काढण्यात येतात. मी त्यावरील उत्तरे कारणांसहित खालील प्रमाणे दिली आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | फिर्यादी हे सिद्ध करते काय की, दि.२४.०३.२०२१ रोजी रात्री ११.३० वा. चे सुमारास मौजे भाडळी बु., ता.फलटण, जि.सातारा गावचे हद्दीत आरोपींनी आपसात | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | संगनमत करुन फिर्यादीचे राहते घरात घुसून फिर्यादीस दुखापत करण्याची किंवा तिचेवर हमला करण्याची, गैरपणे निरुध्द करण्याची भिती घालण्याची पुर्वतयारी करुन गृह अतिक्रमण केले व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.कलम ४५२ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा केला? | |
| २. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी हे त्यांचे घरात झोपले असताना मोठमोठयाने शिवीगाळ करुन घराचा कडीकोयडा तोडून घरामध्ये येवून फिर्यादी यांचे मुलास 'तु व तुझे वडिल आमच्या पेपरला बातम्या देतोस' असे म्हणून हाताने, लाथाबुक्क्याने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.कलम ३२३ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ३. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी करुन सार्वजनिक ठिकाणी शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.कलम ५०४ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ४. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ व दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशाचा अपराध केला व त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.कलम ५०६ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ५. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीचे घराचे दरवाजावर लाथा मारुन घराचा कडीकोयडा तोडून दरवाजाचे नुकसान केले व | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | त्यायोगे आरोपींनी भा.दं.वि.कलम ४२७ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा केला? | |
| ६. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

५. आरोपींविरुध्दचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे फक्त फिर्यादी वनिता विजयकुमार डांगे यांची साक्ष नि.क्र.३० वर नोंदवली आहे. तसेच नि.क्र. २९ वर आरोपी व फिर्यादीमध्ये तडजोड झालेबाबतची पुरसिस दाखल करण्यात आली आहे. सबब, इतर साक्षीदार तपासण्यात आले नाहीत.

**मुद्दा क्र.१ ते ५ करीता –**

६. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीचे घरात घुसून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ व दमदाटी करुन हाताने मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली तसेच फिर्यादीचे घराचे दरवाजावर लाथा मारुन घराचा कडीकोयडा तोडून दरवाजाचे नुकसान केले इ. बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

७. त्याअनुषंगाने अभियोगपक्षाने फिर्यादी वनिता विजयकुमार डांगे यांची साक्ष नि.क्र.३० वर नोंदवली आहे. तिने तिच्या साक्षीत कथन केले की, दि.२४.०३.२०२१ रात्री १०.४० वाजता ती घरी होती. त्यावेळी बाहेर कोणीतरी शिवीगाळ करीत होते. आरोपींनी शिवीगाळ केल्याचा तिचा गैरसमज झाला होता. तिच्या

समक्ष कोणालाही मारहाण झाली नव्हती. तिने फिर्यादवरील तिच्या सही व्यतिरिक्त इतर मजकूर नाकारला आहे. सदर साक्षीदार अभियोग पक्षाचे केसला मदत करीत नाही म्हणुन तिचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परंतु, उलटतपासामध्येही अभियोग पक्षाचे केसला मदत होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल झाला नाही. तिच्या तक्रारीतील अधोरेखांकित भाग अ हा तिच्या माहितीचा नसल्याचे सांगितले. फिर्यादीने गैरसमजुतीतून आरोपींविरुध्द तक्रार दाखल केली असल्याचे व फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झाली असून तिला आरोपींविरुद्ध सदरची केस चालवायची नाही असे कथन करुन त्यांनी तशी संयुक्तीक तडजोड पुरसिस नि.क्र.२९ ला दाखल केली आहे.

८. संचिकेवरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे निष्पन्न होते की, प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी ही महत्वपुर्ण साक्षीदार होती. परंतु तिने तिच्या साक्षीत आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीचे घरात घुसून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ व दमदाटी करुन हाताने मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली तसेच फिर्यादीचे घराचे दरवाजावर लाथा मारुन घराचा कडीकोयडा तोडून दरवाजाचे नुकसान केले असे काहीही सांगितले नाही. तिने असे कथन केले की, आरोपींमध्ये व तिच्यामध्ये काहीही घडलेले नाही.

९. सबब, संचिकेवरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, आरोपींवरील दोषारोप सिद्ध होतील असा कोणताही पुरावा संचिकेवर आलेला नाही. फिर्यादीने घटनेबाबत पुर्णपणे अनभिज्ञता दाखविली आहे. अशा परिस्थितीत

फिर्यादीमध्ये नमुद असणा–या घटनेची सत्यता आणि त्यामधील आरोपींचा सहभाग याबाबत शंका निर्माण होते. तसेच आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये समझोता झालेला आहे. फिर्यादी व आरोपींमध्ये तडजोड झाली आहे व तिला आरोपींविरुद्ध सदरची केस चालवायची नाही असे कथन करुन त्यांनी तशी संयुक्तीक तडजोड पुरसिस नि.क्र.२९ ला दाखल केली आहे. सबब, अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचे आरोप सिध्द केलेले नाहीत, या निष्कर्षापर्यंत मी पोहचलो आहे. त्यामुळे, सबळ, पुरेशा व विश्वासार्ह पुराव्या अभावी आरोपींची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होणार आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.६ करीता</u>–**

१० वरील मुद्दयांचे नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपींवर ठेवण्यात आलेल्या आरोपांमधून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र६ चे उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र.२ आकाश काशिनाथ डांगे, क्र.३ स्वागत ऊर्फ जयराज आनंदराव चव्हाण व क्र.४ अर्जुन ऊर्फ सुनिल दादासोा पिसाळ यांची भा.दं.वि.क.४५२, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम ३४ या अपराधांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीन व बंधपत्र रद्द करुन त्यास खुले करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.)

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2026.07.27 17:34:37 +0530

फलटण. (ए.एस.साटोटे)
दिनांक :२७.०७.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण
(न्यायालय क्र.३)